**<u>प्रेसनोट दिनांक ०६/०७/२०१९</u>**
**<u>येरवडा पोलीस स्टेशन, पुणे</u>**

**<u>कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे ( सीसीटीव्ही कॅमेरे वॉच ) या संकल्पने अंतर्गत लक्ष्मी कृपा को ऑपरेटीव्ह बँक, येरवडा, पुणे येथे जावून अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेवून त्यांना सुरक्षितते संदर्भात मागदर्शन केले बाबत.</u>**

---

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांचे कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे वॉच) या संकल्पने अंतर्गत श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.०१/०७/२०१९ रोजी १२:०० वा. ते १२:३० वा.चे दरम्यान येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील श्री लक्ष्मी को ऑपरेटीव्ह बँक, येरवडा शाखा, पुणे येथे भेट देऊन तेथील अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेऊन त्यांना बँक फसवणूक, बॅग लिफ्टींग, चोरी, जबरी चोरी, ऑनलाईन फसवणूक या गुन्ह्यांची माहिती देऊन असे गुन्हे घडू नयेत या करीता घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन केले. तसेच पोलीस आयुक्तालयाकडून राबविण्यात येणारे सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही वॉच प्रकल्प) या प्रकल्पाची माहिती देऊन बँकेचे आतील भागात तसेच बँकेचे बाहेरील परिसर, रस्ता कव्हर होईल अशा रितीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आवाहन करून तसे लेखी पत्र दिले आहे. तसेच पोलीस आयुक्त कार्यालयाकडून नागरिकांसाठी राबविण्यात येणारे विविध १४ योजनांची माहिती दिली.

अशा प्रकारे श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे या संकल्पने अंतर्गत येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील श्री लक्ष्मी को ऑपरेटीव्ह बँक, येरवडा शाखा, पुणे येथे भेट देऊन तेथील बँक अधिकारी, कर्मचारी यांची बैठक घेवून त्यांना सुरक्षेबद्दल मार्गदर्शन करून, सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत आवाहन करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.






